**महाराष्ट्र शासन**

**क्रमांक** : सपस-२०१६/ प्र.क्र.१२७/ २४ स
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई -४०० ०३२
**दूरध्वनी क्र. ०२२- २२८१२२७३**
दिनांक - ३१ ऑगस्ट, २०१६.

प्रति,
पणन संचालक,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :-** राज्यातील कांद्याच्या घसरलेल्या बाजार भावाबाबत शासनाने करावयाची उपाययोजना.

उपरोक्त विषयाबाबत राज्यातील ज्या शेतकऱ्यांनी माहे जुलै व ऑगस्ट २०१६ मध्ये कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांदा विक्री केली आहे, अशा शेतकऱ्यांना प्रति क्विंटल १०० रुपये अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर सादर करण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय मंत्रीमंडळ बैठकीचे इतिवृत्त प्राप्त झाल्यानंतर निर्गमित करण्यात येणार आहे. (सोबत योजनेच्या अटी व शर्तीची प्रत जोडली आहे.) दरम्यानच्या कालावधीत सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यासाठी जुलै व ऑगस्ट २०१६ या महिन्यातील कांद्याची आवक (कृषी उत्पन्न बाजार समितीनिहाय) कमाल दर/किमान दर तसेच कांदा विक्री केलेल्या पात्र लाभार्थ्यांची संख्या व त्यांना द्याव्या लागणाऱ्या एकूण अनुदानाची रक्कम याबाबतची सविस्तर माहिती अचूक आकडेवारीसह सोबतच्या विवरणपत्रात ( **प्रपत्र अ व प्रपत्र ब** ) भरुन शासनास तात्काळ सादर करण्यात यावी, ही विनंती.

(सुनंदा मो. घड्याळे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**